REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 4 | JANUARY - 2022

# ''महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात वाहक पदावर कार्यरत महिलांच्या आरोग्य विषयक समस्या''

प्रा. अर्चना पडगीलवार
सहयोगी प्राध्यापक,
जी.एन.आझाद समाजकार्य महाविदयालय पुसद.



सारांश (Abstract)

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एस टी परिवहन)हे महाराष्ट्रातील जनतेला प्रवासाची सेवा उपलब्ध करून देणारे एक अग्रगण्य महामंडळ आहे. या माध्यमातून राज्यात जवळपास लाखो प्रवासी दररोज प्रवास करतात. प्रवाशांच्या हितासाठी महामंडळाने आजवर अनेक सुविधा राबविल्यात. नाविन्यपूर्ण बदल केलेत. त्यापैकीच सन 2005 मध्ये महिलांना वाहक पदावर नियुक्ती देवून महिलांना सक्षमिकरणासाठी एक नविन क्षेत्र उपलब्ध करून दिले, त्याबरोबरच महिला प्रवाशांना सुरक्षेच्या दृष्टीने हमी दिली. मागील 15 वर्षात महिला वाहकांनी एसटी महामंडळाला सर्वोच्च सेवा प्रदान केली. परिणामतः दररोज 8 ते 10 तास नोकरीच्या निमित्तीने बस मधील प्रवास महिलांच्या आरोग्यवार परिणाम करता झाला. या अनुषंगाने वाहक पदावर कार्य करतांना कोणत्या प्रकारच्या आरोग्य विषयक समस्या उद्भवत आहेत याविषयी आढावा प्रस्तूत शोध निबंधातून घेण्यात आला आहे.

**की वर्ड—** एसटी महामंडळ, महिला वाहक, सक्षमिकरण, आरोग्य

## ▪ प्रस्तावना—

''प्रवाशांच्या सेवेसाठी'' हे ब्रिदवाक्य घेवून सन 1948 च्या काळात महाराष्ट्र राज्य मार्ग महामंडळाची स्थापना (एमएसआरटीसी) करण्यात आली. प्रारंभी 1932 मध्ये सार्वजनिक प्रवासी वाहतूकीसाठी खाजगी स्तरावर वाहतूक सेवा सुरू केल्या गेली. पुढे भारत स्वतंत्र झाल्यावर 'एमएसआरटीसी' ची स्थापना होवून प्रवाशांच्या सेवेसाठी शासकीय स्तरावर सार्वजनिक वाहतूक सेवा सुरू केली. पुढे हे महामंडळ 'एसटी' या शब्दानेच प्रसिध्द झाले. सदयस्थितीत एसटीची सेवा संपूर्ण महाराष्ट्रात सुरू असून काही ठिकाणी आंतरराज्यात सुध्दा ही सेवा दिल्या जाते. आजवर एसटी महामंडळाने प्रवाशांच्या सेवेसाठी अनेक सेवा सुरू केल्यात तथा धोरणात सूध्दा बदल केला. त्यामध्ये सन 2005 मध्ये महिलांना एसटी वाहक पदी नियूक्त करणे हा मोठा धोरणात्मक निर्णय होता. या निर्णयामूळे केवळ महिलां सक्षमिकरणाला गतीच मिळाली नाही तर महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बळ प्राप्त झाले. या सर्व परिस्थितीत महिला वाहकांच्या आरोग्याचे प्रश्न उपस्थित होतात. सततचा प्रवास, प्रवास काळात गर्भावती महिला वाहकांची फरफट, बाळंतपणातील आजार, बाळाला स्तनपान तथा प्रवासामूळे होणारे शारीरिक आजार अशा अनेक आजारांनी महिला वाहक त्रस्त असतात.

प्रस्तूत शोध निबंधातून महिला वाहकाच्या आरोग्य विषयक समस्या अभ्यासण्यात आल्या असून त्याकरीता प्राथमिक स्त्रोताचा उपयोग करण्यात आला आहे.

## ▪ शोध निबंधाचे उददेश

1 महिला वाहकांच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास करणे

2. आरोग्य विषयक समस्यांवर कशा प्रकारे समाधान शोधल्या जाते या विषयीचा अभ्यास करणे

## ▪ अध्ययन पध्दती

प्रस्तूत शोध निबंध प्राथमिक स्त्रोतावर आधारीत असून यवतमाळ जिल्हयातील एसटी विभागात कार्यरत एकूण महिला वाहकांपैकी 30 महिलांची निवड गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दती अंतर्गत सहेतूक नमुना निवड पध्दतीच्या माध्यमातून करण्यात आली. तथा तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची पध्दतीचा उपयोग करण्यात आला.

## ▪ महिला वाहकांची वैयक्तिक माहिती

अध्ययनासाठी 30 महिला वाहकांची निवड करण्यात आली होती त्यापैकी 25 ते 35 वर्ष वयोगटातील 11 तर 36 ते 45 वर्ष वयोगटातील 19 महिला होत्या, त्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 36.66 व 63.34 होते

अध्ययनात समाविष्ट महिला वाहकांची शैक्षणिक स्थिती असे दर्शविते की, 5 महिला वाहकांचे शिक्षण एसएससी पर्यंत झालेले होते. तर एचएससी पर्यंत शिक्षण झालेल्या महिलांची संख्या 13 होती, त्यांचे शेकडा प्रमाण 43.33 होते. तसेच पदविधर महिला वाहकांची संख्या 10 होती व पदव्युत्तर शिक्षण झालेल्या महिलांची सख्या 02 होती. त्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 33.33 व 06.33 होते.

महिला वाहकांची वैवाहिक स्थिती असे दर्शविते की 93.33 टक्के महिला विवाहीत होत्या, तर 06.67 टक्के महिला विधवा होत्या.

महिला वाहकांची जातीय वर्गवारी असे दर्शविते की, एकूण 30 उत्तरदात्यांपैकी 23.33 टक्के महिला वाहक ओपन वर्गवारीतील तर ओबीसी–26.66 टक्के, एससी 23.33 टक्के, एसटी 16.66 टक्के व व्हीजे या वर्गवारीतील 10 टक्के महिला होत्या

महिला वाहकाच्या कुटुंबाचे एकत्रित मासिक उत्पन्न असे दर्शविते की रू. 10 हजार पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या महिला वाहकांचे शेकडा प्रमाण 23.33 होते तर, रू. 10000 ते 15000 उत्पन्न असणाऱ्या महिला वाहकांचे शेकडा प्रमाण 50.00 होते व रू. 15001 ते 20000 उत्पन्न असणाऱ्या महिलांचे शेकडा प्रमाण 20.00 होते. तसेच रू. 20001 ते 25000 दरम्यान उत्पन्न असणाऱ्या महिला वाहकांचे शेकडा प्रमाण 06.66 होते.

अध्ययनात समाविष्ट एकूण 30 महिला वाहकांपैकी 43.33 टक्के महिला पाच वर्षापेक्षा कमी कालावधी पासून नोकरीमध्ये सहभागी झाल्या होत्या. तर पाच ते सात वर्षापासून 33.33 टक्के, आठ ते अकरा वर्षापासून 16. 66 टक्के अकरा वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेल्या महिला वाहकांचे शेकडा प्रमाण 06.66 होते.

**सारणी 1**
**महिला वाहकांची वैयक्तीक माहिती**

| वैयक्तीक माहिती | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 वयोगट | 1. 25 ते 35 वर्ष | 11 | 36.66 |
| | 2. 36 ते 45 वर्ष | 19 | 63.34 |
| | **एकूण** | **30** | **100** |
| 2. शिक्षण– | 1. एसएससी | 05 | 16.66 |
| | 2. एचएससी | 13 | 43.33 |
| | 3. पदवीधर | 10 | 33.33 |
| | 4. पदव्युत्तर | 02 | 06.33 |
| | **एकूण** | **30** | **100** |
| 3.वैवाहिक स्थिती | 1. विवाहीत | 28 | 93.33 |
| | 2. विधवा | 02 | 06.67 |
| | **एकूण** | **30** | **100** |
| 4. जातीय वर्गवारी | 1. ओपन | 07 | 23.33 |
| | 2. ओबीसी | 08 | 26.66 |
| | 3. एससी | 07 | 23.33 |
| | 4. एसटी | 05 | 16.66 |
| | 5. व्हीजे | 03 | 10.00 |
| | **एकूण** | **30** | **100** |
| 5.कुटुंबाचे एकत्रित मासिक उत्पन्न | 1.रू. 10,000 पेक्षा कमी | 07 | 23.33 |
| | 2.रू.10,000 ते 15,000 | 15 | 50.00 |
| | 3.रू.15,001 ते 20,000 | 06 | 20.00 |
| | 4.रू.20,001 ते 25,000 | 02 | 06.66 |
| | **एकूण** | **30** | **100** |
| 6. वाहक पदी सेवेचा कालावधी | 1. पाच वर्षापेक्षा कमी | 13 | 43.33 |
| | 2. पाच ते सात वर्ष | 10 | 33.33 |
| | 3. आठ ते अकरा वर्ष | 05 | 16.66 |
| | 4. अकरा वर्षापेक्षा अधिक | 02 | 06.66 |
| | **एकूण** | **30** | **100** |

### ▪ महिला वाहकांच्या आरोग्यविशयक समस्या

### 1. आजारपणात उपचाराचे ठिकाण

महिला वाहकांच्या आरोग्य विषयक समस्येवर अभ्यास करण्यासाठी यवतमाळ जिल्हयातील एसटी विभागातील एकूण 30 महिला वाहकांची निवड करण्यात आली होती. या महिला वाहक आजारी पडल्या नंतर कोणत्या ठिकाणी उपचार घेतात हे अभ्यासले असता असे स्पष्ट होते की, गंभीर आजार वगळता अन्य आजारासांठी ज्यामध्ये सर्दी, खोकला, ताप अशा आजारासाठी घरगुती तथा मेडीकलवरून स्वतःच औषध आणून उपचार घेतल्या जात असल्याचे 82 टक्के महिला दर्शवितात. तर 8 टक्के महिला वाहक अशा आजारांसाठी खाजगी दवाखान्यात उपचार घेतात. तर 10 टक्के महिला मेडीकलवरून औषध आणून उपचार घेत होत्या. शासकीय उपचार एकही महिला वाहक घेत नव्हती. मेडीकल किंवा घरगुती उपचार घेण्याचे कारण असे दर्शविते

की, नोकरी मुळे दवाखान्यामध्ये जाणे शक्य नाही तथा उर्वरित 25 टक्के महिला खाजगी दवाखान्याची फी परवडत नसल्यामुळे घरगुती उपचार घेत होत्या.

## 2. सदयस्थितीत आरोग्य विषयक समस्या—

सारणी 2 मध्ये महिला वाहकांना सदयस्थितीत असलेल्या आरोग्य विषयक समस्या अभ्यासण्यात आल्या आहेत. त्यानुसार 76.66 टक्के महिला वाहकांना पाठदुखीचा त्रास होता तर स्पॉन्डेलायसिस (36.66टक्के), अंगदुखी (93.33 टक्के), कमी दिसने (30.00 टक्के), अशक्तपणा (90.00 टक्के), मानसिक ताण (56.66 टक्के), बीपी(16.66टकके), तसेच शुगर या आजाराने त्रस्त असलेल्या महिला वाहकांचे शेकडा प्रमाण 23.33 टक्के होते.

**सारणी 2**
**सदयस्थितीत आरोग्य विषयक समस्या**

| अक | आरोग्य विशयक समस्या | पर्याय | | |
|---|---|---|---|---|
| | | आहे | नाही | एकूण |
| 1 | पाठदुखीचा त्रास | 23(76.66) | 07(23.34) | 30(100) |
| 2 | स्पॉन्डेलायसीस | 11(36.66) | 19(63.36) | 30(100) |
| 3 | अंगदुखी | 28(93.33) | 02(06.67) | 30(100) |
| 4 | कमी दिसने | 09(30.00) | 21(70.00) | 30(100) |
| 5 | अशक्तपणा/थकवा | 27(90.00) | 03(10.00) | 30(100) |
| 6 | मानसिक ताण | 17(56.66) | 13(43.34) | 30(100) |
| 7 | बीपी | 05(16.66) | 25(83.34) | 30(100) |
| 8 | शुगर | 07(23.33) | 23(76.67) | 30(100) |

(कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते)

## 3. आरोग्य विषयक समस्येचे कारण—

अध्ययनात समाविष्ट बहुतांश महिला वाहक कोणत्या ना कोणत आरोग्य विषयक समस्येने ग्रस्त होत्या. यामागच्या कारणांचा मागोवा घेतला असता कामाची अनिश्चित वेळ असल्यामुळे आरोग्य विषयक समस्या उदभवल्यात या विधानाशी 80 टक्के महिला वाहक सहमत होत्या. तसेच तर 73.33 टक्के महिला वाहक कामाचा प्रचंड ताण असल्यामूळे आरोग्य विषयक समस्या जानवत असल्याचे दर्शवितात. तसेच रस्त्याची दुर्दशा व आरोग्य विषयक समस्येकेडे लक्ष दयायला वेळ नसल्यामूळे आरोग्यविषयक समस्या उदभवल्याचे समान म्हणजेच 93.33 टक्के महिला वाहक दर्शवितात.

**सारणी 3**
**आरोग्यविशयक समस्येचे कारण**

| अक | समस्येचे कारण | सहमत | अल्पसहमत | असहमत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कामाच्या अनिश्चित वेळा | 24(80.00) | 04(13.33) | 02(06.66) | 30(100) |
| 2 | कामाचा प्रचंड ताण | 22(73.33) | 06(20.00) | 02(06.66) | 30(100) |
| 3 | रस्त्याची दुर्दशा | 28(93.33) | 02(06.66) | 00(00.00) | 30(100) |
| 4 | आरोग्यविषयक समस्येकडे लक्ष दयायला वेळ नसने | 28(93.33) | 02(06.66) | 00(00.00) | 30(100) |

(कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते)

## 4. गर्भावस्था तथा बाळंतपणातील समस्या—

गर्भावस्थेत बसचा प्रवास करणे हे कोणत्याही महिलेसाठी एक कठीन प्रसंग असतो. महाराष्ट्रातील रस्त्याची स्थिती, एसटी चे सस्पेंशन यामुळे अनेकदा बसमध्येच महिलांचा गर्भपात तथा बाळंतपण झाल्याच्या

बातम्या वृत्तपत्रामध्ये येत राहातात. जिथे गर्भावस्थेत साधारणतः एक तास प्रवास करणे कठीन होवून जाते अशा स्थितीत महिला वाहकांना दिवसभर व महिनोगणती प्रवास करावा लागतो. या अनुषंगाने गर्भावस्थेत बसच्या प्रवासामुळे आपण किंवा आपल्या सहकाऱ्यांना गर्भपाता सारख्या समस्येचा सामना करावा लागला आहे का हे अभ्यासले असता अशा घटना सतत घडत असतात असे 95 टक्के महिला वाहक दर्शवितात. तर असा प्रसंग स्वतःशीच घडला असल्याचे 35 टक्के महिला वाहक दर्शवितात. गर्भपात जरी झालेला नसला तरी गर्भावस्थेत प्रवासामूळे प्रचंड त्रास सहना करावा लागला असे 100 टक्के मत नोंदवितात.

प्रवासामूळे बाळंतपणात बाळाच्या आहाराचे (स्तनपान) नियोजन पूर्णतः कोलमडून पडते असे सर्वच म्हणजे 100 टक्के महिला वाहक मान्य करतात. बाळाला स्तनपाण करणे हे अतिशय आवश्यक असले तरी मात्र डयुटीमूळे बरेचदा शक्य होत नाही. त्यातून ब्रेस्टच्या संदर्भातील आजार मोठया प्रमानात बळावत असल्याचे 98 टक्के महिला दर्शवितात.

## ▪ निष्कर्ष–

एसटी महामंडळाने महिलांना वाहक पदी नियुक्ती देवून महिलांसाठी सक्षमिकरणाचा एक चांगला पर्याय उपलब्ध करून दिला. मात्र महिलांकडे असलेली कौटुंबिक जबाबदारी तथा निसर्गाने सोपविलेली मातृत्वाची जबाबदारी यामध्ये कामाच्या जबाबदारीचे व्यवस्थापन केल्या जात नसल्यामूळे बहूतांश महिला वाहक आरोग्य विषयक समस्यांचा सामना करीत आहेत. सदयस्थितीत महिला वाहक अनेक प्रकारच्या आजारांनी ग्रस्त असल्यात तरी त्या आपले कर्तव्य पूर्णतः पार पाडत आहेत. यातून आरोग्याकडे दुर्लक्ष होत असून भविष्यात आरोग्याचे प्रश्न गंभीर रूप धारण करू शकतात. यासाठी एसटी महामंडळाने महिला वाहकांसाठी कामाचे नियोजन करतांना आरोग्याचे भान ठेवने आवश्यक आहे.

## ▪ संदर्भ ग्रंथ सूची


- Patil .Urmila Vikas (2018). A Study On Women Bus Conductor Satisfaction In Maharashtra State Road Transport. Journal Of Emerging Technologies And Innovative Research (Jetir). Volume 5, Issue 5 Www.Jetir.Org
- Varghese Shilu & K.Aparna Rao. (2018). A Study On Empowerment Dimension And Its Impact On Work Satisfaction Of Lady Conductors Of Kerala Transport Sector. International Journal of Management and Social Science Research Review, Vol-1, Issue-45, March.
- Administration Report 2014 – 2015. Msrtc